(२५)

भारतीय गैर न्यायिक

भारत INDIA

रु. 500 FIVE HUNDRED RUPEES

पाँच सौ रुपये Rs. 500

सत्यमेव जयते

INDIA NON JUDICIAL

CM 609815

महाराष्ट्र MAHARASHTRA ◐ 2023 ◐

अनु.क्र. ८३३५ दि. २१/५/२०२४ मु.शु.रक्कम ५००/-

दस्ताचा प्रकार हमीपत्र

दस्त नोंदणी करणार आहेत का ? होय/नाही.

मिळकतीचे वर्णन —

मुद्रांक विकत घेणाऱ्याचे नांव दत्तात्रय मारुती मोरे

पत्ता बिबवेवाडी पुणे

दुसऱ्या पक्षकाराचे नांव PMRDA

हस्ते व्यक्तीचे नांव व पत्ता सचिन पाटील बावधन पुणे

शुभांगी सुहास बनकर

परवाना क्र. २२०११९७

मुद्रांक विकत घेणाऱ्याची सही १३४४ शिवाजीनगर, पुणे म.न.पा समोर, पुणे

वरिष्ठ कोषागार अधिकारी पुणे

26 APR 2024

प्रथम मुद्रांक लिपीक कोषागार पुणे करिता

NOTARY ★ INDIA ★ GOVERNMENT OF

MAMTA K. SHAH PUNE DIST. REGD NO.6057 EXPIRY DATE 20/10/2026

...प्रदेश क्षेत्र विकास

हमीपत्र

हमीपत्र आज दिनांक / /२०२४ इसवी ते दिवशी.

मी श्री. दत्तात्रय मारुती मोरे व श्री. जयदीप आनंदराव ठाकर , वय- सज्ञान , राहणार – महेश सोसायटी, बिबवेवाडी, पुणे- ४११ ०३७ हमीपत्र लिहून देते की,

१) मौजे – मुगावडे, ता. – मुळशी , जि.- पुणे, येथील ग. नं. ६०० यांसी एकूण क्षेत्र ३८४०.०० चौ. मी. या मिळकतीमध्ये निवासी/बिगर निवासी पद्धतीचा प्लॉटचे बांधकामाबाबत प्रस्ताव जागामालक / कुलमुखत्यारपत्रधारक म्हणून मी / आम्ही दाखल केला आहे.तूर्त य अजागी म.न.पा.कडून पुरेसा पाणीपुरवठा उपलब्ध होऊ शकत नाही.याची माहिती मला / आम्हाला देण्यात आली असून याला पर्याय म्हणून जागेवरील बोअरद्वारा पाणी उपलब्ध करून देण्याची किंवा टँकरद्वारा पाणी मिळण्याची किंवा व्यवस्था सोसायातीमार्फत करीत आहोत. व त्यासंबंधी आवश्यक त्या वरिष्ठ भूवैज्ञानिक अधिकारी, भूजल सर्व्हेक्षण आणि विकास योजना (G.W.S & D.A) या कार्यालयामार्फत किंवा तत्सम तांत्रिक सल्लागारामार्फत सदर जागी पाणी असल्याबद्दलचे प्रमाणपत्र आणून देणेची कार्यवाही करणे आमचेवर बंधनकारक राहील.

२) इमारत पूर्ण झाल्यावर इमारतीमधील निवासी / बिगर निवासी वापरासाठी म.न.पा. पिण्यासाठी पुरेसा पाणी पुरवठा पुरेशा दाबाने करू शकत नसल्यास पाण्याची पर्यायी व्यवस्था प्रवर्तक या नात्याने इमारतींमधील रहिवाशांना मी / आम्ही करून देण्यास तयार असून त्याची सर्व जबाबदारी मी / आम्ही या हमिपात्राद्वारे स्वीकारत आहे.

३) ग्रामपंचायत मार्फत कोणताही पाणीपुरवठा सुरु न झाल्यास किंवा अपुरा झाल्यास मी / आम्ही कोणत्याही कोर्टाकडे या बाबतीत दावा दाखल करणार नाही.

४) निवासी अगर व्यापारी गाळयाचे विक्रीचे बुकिंग करताना येणाऱ्या करारनाम्यामध्ये पाणी पुरवठ्याची वरीलप्रमाणे सर्व वस्तुस्थिती विशेष बाब म्हणून नमूद करून घेण्याची जबाबदारी राहील. जागेवरील परिस्थितीची जाणीव नियोजित गाळेधारकांना करून दिल्यानंतरसुद्धा या ठिकाणी होणाऱ्या बुकिंगनंतर होणाऱ्या नियोजित गाळेधारकांना पाणी पुरवठा अपुरा झाला तर मनपाचा पुरेसा पाणीपुरवठा सुरु होईपर्यंत माझ्या / आमच्या खर्चाने पुरेसा पाणी पुरवठा करून देण्याची माझी / आमची जबाबदारी राहील. पुणे महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरणास तोशीष लागू देणार नाही.

५) टँकरद्वारा किंवा बोरद्वारा सध्या मिळणाऱ्या पाण्याचे नमुने वेळोवेळी प्रयोगशाळेतून तपासून आणणे व त्या रिपोर्टनुसार पाणी योग्य आढळल्यास पाणी वापरण्यात येईल, याची मी / आम्ही काळजी घेईन / घेऊ.

६) सदरची योजना संपूर्णरीत्या प्रवर्तक / मालक या नात्याने मी / आम्ही अन्य कोणास भविष्य काळात विकल्यास नवीन मालक / प्रवर्तकास या हमिपात्रातील सर्व बाबींची लेखी कल्पना देईन त्याचा समावेश नवीन करारनाम्यात करण्यात येईल याची काळजी घेईन / घेऊ.

७) हे हमीपत्र माझे / आमचे वालीवारसांवर बंधनकारक राहील.

८) सदर प्लॉटमधील संदर्भातील कोणत्याही होणाऱ्या करारामध्ये या हमीपत्राचा समावेश करण्यात येईल व हे हमीपत्र करारनाम्यातील विशेष बाब म्हणून समजण्यास येईल.

वरील हमीपत्र मी / आम्ही राजीखुशीने दि.   /   /२०२४ रोजी लिहून दिले आहे.

पुणे

दिनांक :- 02 MAY 2024 /२०२४

हमीपत्र लिहून देणार

श्री. दत्तात्रय मारुती मोरे

श्री. जयदीप आनंदराव ठाकर

NOTARIAL NOTARIAL NOTARIAL NOTARIAL NOTARIAL

NOTED AND REGISTERED
AT SR. NO. 5981/2024
DATE 02 MAY 2024

BEFORE ME

MAMTA K. SHAH
NOTARY
GOVT. OF INDIA
PUNE DISTRICT